# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०७.०६.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**धंतोली पोलीसांची कामगीरी :— चोरी करणाऱ्या आरोपींना अटक. ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०१.०६.२०२६ चे १७.३० ते १८.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे धंतोली हद्यीत, मॉ भवानी मंदीर, यशवंत स्टेडीयम येथील भगवती मंदीरात कोणीही पुजारी हजर नसतांना, अज्ञात चोरटयाने मंदीरात प्रवेश करुन मुर्तीचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र किमती. ३५,०००/— रु. चे चोरुन नेले होते. फिर्यादी राजीव कृष्णराव ढोले वय ६१ वर्षे रा. तकीया, धंतोली, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात धंतोली तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी १) इरफान हमीद शेख वय २४ वर्ष रा. खरबी, राऊत नगर, वाठोडा, नागपूर २) सोहेल उर्फ लाला जावेद शेख वय २२ वर्ष रा. जुनी वस्ती, सेंटर वार्ड, हिंगणघाट, वर्धा, यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक सखोल विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे लकडगंज व तहसील हद्यीत ,चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन सोन्याचे डोरले, एक दानपेटी व ॲक्टीवा मोपेड क्र. एमएच ४९ पी ५७०९ असा एकूण ४७,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. एकुण ०३ गुन्हे उघडकिस आनलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), श्री. किरण पोपळघट, मा. सहा. पोलीस आयुक्त (सिताबडी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि साईनाथ रामोड, सपोनि चंद्रकात कोसे, पोउपनि शुभम बकाल, पोहवा सुधिर मेश्राम, पोअं. अमोल लोणकर, हरीष कांबळी, मणिक दहीफळे, विजय दंदी व प्रितम मोरे यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे धंतोली :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, प्लॉट क्र. ०७, अजनी चौक, वर्धा रोड येथे सारस्वत को—ऑपरेटीव्ह बॅकेंची शाखा आहे. फिर्यादी श्रीमती स्वप्नाली अमित पात्रीकर वय ४२ वर्षे रा. दीनदयाल नगर, नागपूर हया शाखा व्यवस्थापक आहेत. दिनांक २८.०२.२०२४ ते माहे जानेवारी २०२६ दरम्यान, आरोपी १) पुरुषोत्तम मोहनलाल तापडीया वय ६० वर्ष २) गिताबाई पुरुषोत्तम तापडीया वय ५५ वर्ष दोन्ही रा. प्लॉट क्र. ५८, ज्ञानेश्वर सोसायटी, शंभुनगर, तिरंगा चौक, मानकापूर, नागपूर यांनी संगनमत करुन त्यांचा वीरचक्र गृहनिर्माण संस्था, नागपूर येथील प्लॉट क्र. ९३ हा बॅकेत १ करोड ४० लाख रुपयात गहाण ठेवला होता. बॅकेंचे लेखा परिक्षणात प्लॉटचे मुल्य फारच कमी असल्याचे निदर्शनास आले. आरोपी यांनी बॅकेचे व्हॅल्युअर यांना मॅनेज

करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे प्लॉट बॅकेंत गहाण ठेऊन कर्जाची उचल करुन बॅकेंची फसवणूक केल्याचे फिर्यादी यांचे निदर्शनास आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्ज चौकशीवरुन पोलीस ठाणे धंतोली येथे पोउपनि. मारकवाड ८३२९९३२२३० यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४),३३६(३),३४०(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे कोराडी</u> :—** दिनांक ०७.०६.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, कोराडी नाका पेट्रोल पंपजवळ आशिष देशमुख यांचे घराचे बांधकाम साईटवर काम करणारा व तेथेच राहणारा मजुर नामे निलेश शंकर मरकाम वय २६ वर्ष हा भिंतीला हातोडीने खिळा ठोकत असतांना, अचानक भिंत त्याचे अंगावर पडल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकरीता मॅक्स हॉस्पिटल, मानकापूर व तेथुन मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान १२.३५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यापरकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि क्रांती पवार ८६००९७५६६६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उपनिरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**